**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.**
**कोकण परिमंडळ कार्यालय**
**ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी**

---

**ग्राहक तक्रार क्र. १५/२०१४** **दि. ०२.०६.२०१४**

| | | |
|---|---|---|
| **श्री. सचिन सुरेश सावंत**<br>**११६९,गवळीवाडा,**<br>**दत्तमंदीर पाराजवळ**<br>**ता. /जि. रत्नागिरी.** | } | **तक्रारदार ग्राहक** |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| **कार्यकारी अभियंता, महावितरण**<br>**विभागीय कार्यालय रत्नागिरी** | } | **विरुध्द पक्षकार** |
| **फोरम उपस्थिती** | } | **१) श्री. डी. एस्. जामखेडकर, अध्यक्ष**<br>**२) श्री. व्ही.बी.जगताप,**<br>**सचिव तथा कार्यकारी अभियंता**<br>**३) श्री.ज. पु. बिवलकर**<br>**सदस्य** |
| **ग्राहकाच्या वतीने** | } | **१) श्री. मिलींद प्रभाकर देसाई (प्रतिनिधी)**<br>**२) श्री. सचिन सुरेश सावंत** |
| **विरुध्द पक्षकाराच्या वतीने** | } | **१) श्री. अनिल वासुदेव महाजन**<br>**कार्यकारी अभियंता, रत्नागिरी**<br>**२) श्री. पुरुषोत्तम शां.गांधी**<br>**उपकार्यकारी अभियंता,**<br>**उपविभाग जाकादेवी ग्रामीण-२** |

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग, ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल (ओम्बुडस्मन) विनिमय २००६ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

श्री. सचिन सुरेश सावंत ११६९ गवळीवाडा दत्तमंदीर पाराजवळ रत्नागिरी यानी त्याच्या ओरी जाकादेवी येथील सर्व्हे नं. ११४/१/१ या शेत जमीनी मध्ये वीज पंपाचे कनेक्शन देणे बाबत महावितरण विलंब करीत असल्याबाबतची तक्रार फॉर्म अ मध्ये मंचाकडे दि.०२.०६.२०१४ रोजी दाखल केलेली आहे. तक्रार प्राप्त होताच या मंचाकडील पत्र क्रं. ८५ दि.०५.०६.२०१४ अन्वये कार्यकारी अभियंता रत्नागिरी यांचेकडे स्पष्टीकरण मागविणेत आले, सदर पत्रास अनुसरुन कार्यकारी अभियंता रत्नागिरी यानी त्यांचे पत्र क्रं. ४९८१ दि. ०२.०७.२०१४ अन्वये स्पष्टीकरण सादर केले. सर्व प्राथमिक बाबींची पुर्तता झालेनंतर उभय पक्षाना नोटीस काढून दि.२२.०७.२०१४ रोजी सुनावणी घेण्याचे निश्चित करण्यात आले.

अर्जदाराच्या तक्रारीचे स्वरुप असे की त्यानी त्याचे वर नमुद केलेल्या जमिनीमध्ये वीज पंपाचे कनेक्शन मिळण्यासाठी सन २०१२ मध्ये अर्ज केला तसेच कनेक्शनची मंजुरी झालेनंतर जुलै २०१३ मध्ये कनेक्शनसाठी आवश्यक पैसे भरले तसेच चाचणी अहवाल पण सादर केला पण वारंवार पाठपुरावा करुन देखील त्यांच्या पंपाचे कनेक्शन न मिळाल्यामुळे त्यानी फेब्रुवारी २०१४ मध्ये अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडे अर्ज केला पण कक्षाने दिलेल्या निर्णयामुळे त्यांचे समाधान न झालेमुळे त्यानी रितसर मंचाकडे अर्ज दाखल केला असून कनेक्शन ताबडतोब मिळावे तसेच आंबा व काजूंच्या झाडांचे पाण्याअभावी नुकसान झालेले आहे त्या नुकसानाची भरपाई होणेबाबत आदेश देण्याबाबत विनंती केली आहे.

महावितरणने आपल्या स्पष्टीकरणामध्ये नमुद केले आहे की सावंत यानी ३ अश्वशक्तीच्या पंपाचे कनेक्शन मिळण्यासाठी दि.१७.०९.२०१२ रोजी अर्ज केला असून मे २०१३ मध्ये या कनेक्शनची मंजुरी देण्यात आली आहे तसेच ग्राहकानी पण जुलै २०१३ मध्ये अनामत रक्कमेचा भरणा केलेला आहे व चाचणी अहवाल दिलेला आहे. जेष्ठता यादीनुसार या ग्राहकाचा अनुक्रमांक १७ आहे. मुख्य अभियंता (वितरण) मुख्य कार्यालय यांचे पत्रानुसार तसेच कार्यकारी संचालक प्रकल्प यांचे पत्रानुसार शेती पंपाचे कनेक्शन जेष्ठता यादीनुसारच देणे बंधनकारक आहे.

दि.२२.०७.२०१४ रोजी झालेल्या सुनावणी मध्ये स्वत: ग्राहक व प्रतिनिधी श्री. मिलींद प्रभाकर देसाई सहभागी होते तसेच महावितरणकडून श्री महाजन कार्यकारी अभियंता व श्री. गांधी सहाय्यक अभियंता जाकादेवी यानी आपला युक्तिवाद केला.

श्री.देसाई यानी ग्राहकाच्या वतीने आपला युक्तीवाद सादर करताना नमुद केले की सप्टेंबर २०१२ मध्ये अर्ज दाखल केल्यानंतर, व महावितरणकडून कोटेशन प्राप्त झाल्यानंतर जुलै २०१३ मध्ये कनेक्शनसाठी आवश्यक अनामत रक्कम भरली तसेच चाचणी अहवाल पण दिलेला आहे. त्यानंतर महावितरणने त्याना कोणतीही पुर्वसुचना न देता फक्त पंप हाऊसच्या खिडकीमधून पाहून वायरींग अपुर्ण असल्याचा निष्कर्ष काढला आहे. महावितरणला करावयाच्या निरिक्षणाबाबत पुर्व सुचना दिली

गेली असती तर योग्य प्रकारे निरिक्षण झाले असते. चाचणी अहवालामधील वायरींग मध्ये काही त्रुटी असतील तर त्या ग्राहकास कळविल्यानंतर ताबडतोब दुर करण्यात येतील, पण पैसे भरल्यापासून आज पर्यन्त एक वर्षाचा कालावधी होऊन गेलेला आहे. तरीपण महावितरणकडून कनेक्शन देण्यात आलेले नाही अर्जात नमुद केलेली विहीर डोंगराच्या पायथ्याशी असून डोंगर उतारावर झाडांची लागवड केलेली आहे त्यामुळे झाडाना पाणी घालण्यासाठी डोक्यावरुन वहातूक करावी लागते हे काम खर्चिक व कठीण आहे त्यामुळे लौकरात लौकर वीज कनेक्शन देण्याबाबत आदेश व्हावा अशी ग्राहक प्रतिनिधीनी मंचाकडे विनंती केली.

महावितरणची बाजू मांडताना श्री. महाजन यानी नमुद केले की, हया कनेक्शन करीता दिलेला अर्ज व पैसे भरल्याची तारीख याबाबत महावितरणचे दुमत नाही पण अर्जदारानी केलेले वायरींग अपुर्ण असून त्याबाबत ग्राहकाला लेखी सुचना दिलेली आहे, हे कनेक्शन देण्याकरीता ११ पोलची लघूदाब वाहीनी तयार करावी लागणार आहे त्यासाठी आवश्यक पोल वहातूक केलेली आहे. सध्या पावसाळयाचे दिवस आहेत व हया दिवसामध्ये ठेकेदार मिळत नाहीत. ठेकेदार नेमणुक करण्यासाठी वेगवेगळया वर्तमान पेपरमध्ये जाहीराती दिलेल्या आहेत ठेकेदार प्राप्त होताच जेष्ठता यादीनुसार हया कनेक्शनचे काम पुर्ण करण्यात येईल.

यावर मंचाने श्री. महाजन याना निश्चित कालावधी सागण्याबाबत विचारणा केली त्यावर श्री. महाजन यानी नमुद केले की, जेष्ठता यादीनुसार अर्जदाराचा जेष्ठता क्रमांक १७ आहे. मुख्य कार्यालयाच्या परिपत्रकाप्रमाणे जेष्ठता यादीनुसारच कनेक्शनची कामे करावयाची आहेत तथापी पावसाळयानंतर ठेकेदार उपलब्ध होतील व त्यानंतर शेती पंपाच्या कनेक्शनची कामे हाती घेण्यात येतील तरीदेखील हया कनेक्शन चे काम डिसेंबर २०१४ पर्यंत पुर्ण करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणामध्ये दाखल झालेली कागदपत्रे व उभयपक्षानी केलेला युक्तीवाद यामधून अर्जदारानी कनेक्शनकरीता केलेला अर्ज व पैसे भरल्याची तारीख यामध्ये उभयपक्षानी सहमती दर्शविली आहे तथापी टेस्टरिपोर्ट प्रमाणे वायरींगचे काम अपुर्ण आहे व याची लेखी सुचना महावितरणने अर्जदारास दिलेली आहे असा मंचाचा निष्कर्ष आहे. हया वायरींगचे काम अर्जदारानी पुर्ण करुन घ्यावे असे मंचास वाटते तरी देखील हे कनेक्शन देण्याबाबत महावितरणकडून विलंब झ ालेला आहे हे निश्चित आहे.

कोकण भागामध्ये भौगोलिक परिस्थिती डोंगराळ आहे तसेच येथील पावसाळा मोठया प्रमाणात असतो व त्यामुळे ठेकेदार मिळत नाहीत हा महावितरण कडून करण्यात आलेला युक्तीवाद जरी सत्य असला तरी यामध्ये नाहक ग्राहक भरडला जातो हया बाबींचा विचार करुन ठेकेदार मिळविण्यासाठी महावितरणने युध्द पातळीवर प्रयत्न करुन हे कनेक्शन विनाविलंब देणे गरजेचे आहे असे मंचाचे मत आह. महावितरणकडून हे कनेक्शन देण्याकरीता डिसेंबर २०१४ पर्यन्तचा कालावधी लागणार असल्याचे नमुद करण्यात आलेले आहे तथापी यामध्ये अगोदरच विलंब झालेला असल्यामुळे महावितरणने हे कनेक्शन ऑक्टोबर २०१४ पर्यन्त देण्याबाबत कार्यवाही करावी असे

मंचाचे मत आहे या मध्ये आवश्यकतेनुसार अर्जदारानी देखील अतिरीक्त मनुष्यबळाचा पुरवठा करुन उभय पक्षांच्या सहकार्याने व समन्वयाने हे काम पुर्ण करण्याबाबत मंच आदेश देत आहे. तसेच कनेक्शन मिळाल्यानंतर झालेल्या विलंबाकरीता कृतीमानके विनियम २०१४ मधील तरतुदीनुसार ग्राहक स्वतंत्रपणे अर्ज करुन नुकसान भरपाईची मागणी करु शकेल.

मंचाने नोंदविलेल्या वरील निष्कर्षानुसार खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

# आदेश

**१) महावितरणने प्रस्तुत प्रकरणामधील वीज पंपाचे कनेक्शन आवश्यक वाहीनीची उभारणी करुन ३१ ऑक्टोबर २०१४ पर्यंत देणे बंधनकारक राहील, मात्र यानंतर होणाऱ्या विलंबास महावितरण दंडास पात्र राहील.**

**२) खर्च व अनुषंगिक बाबी करीता कोणताही आदेश नाही.**

**३) या आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.**

**पत्ता :-सचिव,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग,**
**६०६/६०८, केशवा,**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५१.**
**फोन नं. ०२२- २६५९२९६५**

| | | |
|---|---|---|
| **श्री. डी. एस्. जामखेडकर** | **श्री. व्हि. बी. जगताप** | **श्री. ज. पु.बिवलकर** |
| **अध्यक्ष** | **सचिव / कार्यकारी अभियंता** | **सदस्य** |
| **ग्रातनिमं, कोकण परिमंडल** | **ग्रातनिमं, कोकण परिमंडल** | **ग्रातनिमं, कोकण परिमंडल** |

**दिनांक :- १४.०८.२०१४**
**ठिकाण :- रत्नागिरी.**